महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
शिक्षण शुल्क समिती, मुंबई
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com


## शिक्षण शुल्क समितीच्या दि.११-०४-२०२३ च्या बैठकीचे इतिवृत्त

शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीत सुधारणा करण्यासाठी गटीत केलेल्या उपसमितीने सादर केलेला अहवाल समितीपुढे सादर करून त्यावर चर्चा करणे तसेच इतर विषयांबाबत शिक्षण शुल्क समितीची बैठक **दि.११-०४-२०२३ रोजी स.११:०० वाजता** मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचे अध्यक्षतेखाली मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्या दालनात पार पडली. शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मा.श्री. विकास चंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | अध्यक्ष |
| २ | मा.श्री. बबन माळी, उपसचिव, वित्त विभाग (मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ३ | मा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, प्र. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ४ | डॉ. श्रीनिवास धुरे, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ५ | श्री.व्ही.वी. शर्मा, सनदी लेखापाल | सदस्य |
| ६ | डॉ. नलिनी पाटील - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शिक्षणशास्त्र) तथा प्राचार्य, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ एज्यूकेशन, पुणे | सदस्य |
| ७ | श्री. हरिविजय शिंदे, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |

डॉ.सुहास पाटील, अध्यक्ष, नियमावली सुधारणा उपसमिती तथा प्राचार्य शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ हे ऑनलाईन पध्दतीने सदर बैठकीस उपस्थित होते. विशेष निमंत्रित म्हणून श्री. सुनिल सोनवणे, प्र.प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, मुंबई तथा शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ज्ञ, श्री.मनोज चांडक, विशेष निमंत्रित-सनदी लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे, श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल हे उपस्थित होते. तसेच डॉ. महेश

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI

Scanned with CamScanner

देशपांडे - खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारीरिक शिक्षणशास्त्र) तथा सहयोगी प्राध्यापक, चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पुणे यांनी बैठकीस उपस्थित राहू शकत नसल्याबावत कळविले आहे.

सदर बैठकीच्या सुरूवातीस सदस्य तथा सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांनी उपस्थितांचे स्वागत करून बैठकीच्या आयोजनाबाबतची प्रस्तावना सादर केली. त्यानंतर शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तावर झालेल्या कार्यवाहीबावत तसेच शिक्षण शुल्क नियमावलीत सुधारणा करण्यात आलेल्या उपसमितीच्या अहवालावर चर्चा करण्यात आली. श्री.मनोज चांडक, विशेष निमंत्रित-सनदी लेखापाल, शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे यांनी शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमावलीबाबत समिती सदस्यांना माहिती दिली. तसेच शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीत शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या नियमावलीच्या अनुषंगाने चर्चा करून काही सुधारणा/बदल सूचविले आहेत. सदर बैठकीत विषयपत्रिकेनुसार खालील विषयाबावत चर्चा व निर्णय झाले.

**विषय क्र.०१:- शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तावाबत**

**आढावा** :- सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तातील कार्यपूर्तिबाबतचा अहवाल समितीस सादर केला. याच बैठकीच्या इतिवृत्तातील विषय क्र.७ नूसार ऑनलाईन स्वरूपात प्रस्ताव सादर करणारे सॉफ्टवेअर तयार करणेबाबतच्या प्रस्तावावर उच्च शिक्षण संचालनालय यांना लवकरात लवकर कार्यवाही करणेबाबत सूचित करण्यात आले. तसेच प्रक्रिया शुल्काची रक्कम जमा करणेबाबतचा शासन निर्णय निर्गमित करणेबाबतचा प्रस्ताव उच्च शिक्षण संचालनालय स्तरावरून शासनास लवकरात लवकर सादर करणेबाबत निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.०२:- शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीत सुधारणा करण्यासाठी गठीत केलेल्या उपसमितीने सादर केलेल्या अहवालावर चर्चा करून शिक्षण शुल्क समितीची सुधारित नियमावली व नमुना अर्ज अंतिम करणेबाबत.**

-शुल्क नियामक प्राधिकरण, बांद्रा यांच्या नियमावली व अर्जाचा अभ्यास करून तसे बदल/सुधारणा शिक्षण शुल्क समितीच्या नियमावली व अर्जामध्ये करण्याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाच्या दि.०५.१२.२०२२ च्या पत्रान्वये डॉ.सुहास रूपराव पाटील, प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली उपसमितीचे गठन करण्यात आले होते. सदर उपसमितीने तीन ऑनलाईन बैठका घेवून अभ्यास करून शिफारशींचा सविस्तर अहवाल समितीस सादर केलेला आहे. उपसमितीने सादर केलेला अहवाल व नमुना अर्ज समितीपुढे सादर करण्यात आला आहे. सदर अहवालातील शिफारशींवर सविस्तर चर्चा करण्यात येवून उपसमितीच्या अहवालावर नियमावलीबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI * MUMBAI *

Scanned with CamScanner

२.१ महाविद्यालयांचा खर्च हा नियमानूसार झालेला असल्यास, वेतन बँकेमार्फत अदा केलेले असल्यास, एन.सी.टी.ई. निकषानूसार तसेच विद्यापीठाची मान्यता असलेला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग भरलेला असल्यास, महाविद्यालयांची शुल्कासहित इतर सर्व माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली असल्यास, यावावतच्या इतर सर्व अनुषंगीक अभिलेखांची तपासणी करून समितीला तशी खात्री झाल्यास अशा महाविद्यालयांच्या वावतीत खर्चानूसार येणारे शुल्क मंजूर करणेवाबत तसेच शुल्क मंजूर करतेवेळी जास्तीत जास्त किती टक्के वाढ दयायची यावावत अंतिम अधिकार समितीला असेल, असा निर्णय झाला.

२.२ शुल्क निश्‍चिती करताना महाविद्यालयांचे खर्चामध्ये Affiliation fee गृहित धरण्यात येत होती. तथापि यापुढे शुल्क निश्‍चिती करताना महाविद्यालयांच्या खर्चामध्ये Eligibility Fee, University Fee, Examination Fee, Laboratory Fee, Library Fee, Gymkhana Fee, Information Brochure Fee इ. यांचा समावेश करण्यात यावा आणि उपरोक्त सर्व शुल्कांचा खर्चामध्ये समावेश केला जाणार असल्यामुळे सर्वसमावेश असलेले शिक्षण शुल्क(Tuition Fee) व विकास शुल्कच(Development Fee) निश्‍चित करण्यात यावे, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून केवळ शिक्षण शुल्क(Tuition Fee) व विकास शुल्क(Development Fee) आकारावे. इतर कोणतेही शुल्क आकारू नये. महाविद्यालयांनी इतर शुल्क आकारल्याचे निदर्शनास आल्यास अशा महाविद्यालयांवर समिती ठरवेल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असे ठरले.

२.३ महाविद्यालयांच्या शुल्क निश्‍चितीकरिता प्रस्ताव मागविण्यापासून शुल्क निश्‍चितीपर्यंतचे समितीचे कायमस्वरूपी एक वेळापत्रक निश्‍चित करून समितीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे तसेच महाविद्यालयांना कळविणेवाबत निर्णय घेण्यात आला.

२.४ Academic Audit प्रस्तावासोबत सादर करणेवाबत महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

२.५ समितीच्या नियमावलीतील मुद्दा क्र.२.१०.५ वगळण्यात यावा.

२.६ शुल्क निश्‍चिती करताना केवळ बँकेमार्फत अदा करण्यात आलेले वेतन खर्चात गृहित धरण्यात येईल. रोख(cash) स्वरूपात दिलेले वेतन पूर्णपणे अमान्य करण्यात येईल, असा निर्णय झाला.

२.७ समितीच्या नियमावलीतील २.३.२ मध्ये शुल्क नियामक प्राधिकरण, वांद्रे यांच्या नियमावलीतील तरतुदींचा अभ्यास करून त्याप्रमाणे वदल करणेवावत विचारविनिमय करणे, असा निर्णय झाला.

२.८ समितीच्या नियमावलीतील २.५.३ मध्ये Where admissions are less than ४० % of sanctioned intake then १५ % of total fees would be added ही तरतूद वगळण्यात यावी.

२.९ समितीच्या नियमावलीतील २.६.३ मधील तरतूद वगळण्यात यावी.

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI * MUMBAI *

Scanned with CamScanner

२.१० समितीच्या नियमावलीतील २.१०.१ मधील तरतूदीमध्ये शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या तरतूदीप्रमाणे बदल करण्यात यावेत, असा निर्णय झाला.

२.११ समितीच्या प्रस्तावित नियमावलीची soft copy समितीचे सर्व सदस्य, विशेष निमंत्रित यांना अभिसरीत (Circulate) करून त्यावर सूचना/सुधारणा/बदल मागविण्यात यावे, सदरच्या सूचना समितीच्या पुढील बैठकीत सादर करून शिक्षण शुल्क समितीची नियमावली अंतिम करण्यात येईल, असे टरले.

२.१२ नियमावली अंतिम झाल्यानंतर सर्व महाविद्यालयांची ऑनलाईन स्वरूपात कार्यशाळा घेवून प्रस्ताव कसे भरावेत, यावावत मार्गदर्शन करण्यात यावे,

**विषय क्र.०३- दि.२५.११.२०२२ च्या बैठकीत मंजूर करून दिलेल्या शुल्कासंदर्भात काही महाविद्यालयांकडून आक्षेप प्राप्त झाले आहेत, सदर प्राप्त झालेले आक्षेप समितीच्या विचारार्थ सादर.**

-०३ महाविद्यालयांकडून सर्वसाधारण विनंतीपर आक्षेप प्राप्त झाले होते त्यामध्ये समितीस आवश्यक असलेले अभिलेख जोडलेले नसल्यामुळे महाविद्यालयांची विनंती मान्य करता येत नाही. तसेच महाविद्यालयांचे शुल्क कमी होण्याची कारणे उपरोक्त महाविद्यालयांस कळविण्यात यावी, असे टरले. .(परिशिष्ट-अ)

**विषय क्र.०४महाविद्यालयांचे एन.सी.टी.ई. च्या सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमता आदेशानूसार शुल्क फेरनिश्चिती वावत.**

- श्री.सुरूपसिंग हिन्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, जि. नंदूरबार व नानीवाई कॉलेज ऑफ एज्यूकेशन, अमरावती या दोन महाविद्यालयांनी एन.सी.टी.ई.चे सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे आदेश सादर केल्यामुळे महाविद्यालयांचे प्रस्ताव नवीन विद्यार्थी संख्या गृहित धरून खर्च लेखापालांकडून फेरतपासणी करून फेरनिश्चित केलेल्या शुल्कास मान्यता देण्यात आली.(परिशिष्ट-व)-२ महाविद्यालये

सदर महाविद्यालयांचे यापूर्वी दि.२५-११-२०२२ च्या बैठकीत मंजूर झालेले परिशिष्ट इ मधील प्रस्ताव क्र.११२, तसेच दि.११.०४.२०२२ च्या बैठकीत मंजूर झालेले परिशिष्ट अ मधील प्रस्ताव क्र.५ चे शुल्क चे शुल्क रद्द समजण्यात यावे.

**विषय क्र.०५- महाविद्यालयांच्या विकास शुल्कास मान्यता देणेवावत.**

शिक्षण शुल्क समितीची दि.०५.०१.२०२२ व दि.११.०४.२०२२ च्या बैठकीतील निर्णयानूसार महाविद्यालयांकडून विकास खाते व विकास योजना मागविण्यात होत्या. समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीनंतर उर्वरित महाविद्यालयांपैकी एकूण ३ महाविद्यालयांकडून उपरोक्त अभिलेख प्राप्त झालेले आहेत. तरी या ३ महाविद्यालयांना सन २०२२-२३ पासून समितीने मंजूर करून दिलेल्या शिक्षण शुल्कावर १० टक्के विकास शुल्क लागू राहील.

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI * MUMBAI *

Scanned with CamScanner

तसेच श्री.सुरूपसिंग हिन्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर, जि. नंदूरबार व नानीबाई कॉलेज ऑफ एज्यूकेशन, अमरावती दोन महाविद्यालयांनी एन.सी.टी.ई.चे सुधारित विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे आदेश सादर सदर महाविद्यालयांच्या फेरनिश्चित केलेल्या शिक्षण शुल्कावर १० टक्के विकास शुल्क लागू राहील. **(परिशिष्ट क)** सदर महाविद्यालयांचे यापूर्वी दि.२५.११.२०२२ च्या बैठकीत मंजूर झालेले परिशिष्ट अ४ मधील अ.क्र ३ व अ.क्र.३८ मधील विकास शुल्क रद्द समजण्यात यावे.

पुढील वेळेस प्रस्ताव सादर करताना उपरोक्त महाविद्यालयांना शैक्षणिक वर्षात विकास योजनांवर खर्च केल्याबाबतचा विकास शुल्काचा स्वतंत्र ताळमेळ (हिशोब) सादर करणे बंधनकारक राहील, असा निर्णय झाला. उर्वरित महाविद्यालयांनी परस्पर विकास शुल्क आकारू नये,असा निर्णय झाला.

**विषय क्र.६ अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती शुल्क मंजूरीबाबत.**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (cet cell) यांच्या सन २०२२-२३ च्या नोंदणीकृत यादीनूसार एकूण १२४ विनाअनुदानित व कायम विना अनुदानित अल्पसंख्यांक शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये नोंदणीकृत आहेत. शिक्षण शुल्क समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीच्या इतिवृत्तानूसार सन २०२१-२२ मध्ये ज्या महाविद्यालयांनी अभिलेख सादर न करता अंतिम मंजूर शुल्कच (वाढ न करता)सन २०२१-२२ मध्ये महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करून घेतले, अशा महाविद्यालयांकडून सन २०२२-२३ करिता नव्याने अभिलेख मागविण्यात यावेत असे ठरले होते. अशा महाविद्यालयांकडून तसेच सन २०२१-२२ ला महाडीबीटी पोर्टलवर शुल्क सादर न केलेल्या तसेच महाडीबीटी पोर्टलवर शुल्क भरले परंतू त्याची समितीमार्फत अभिलेख सादर करून पडताळणी न केलेल्या अशा एकूण ५१ महाविद्यालयांकडून सन २०२२-२३ करिता शुल्क पडताळणी करिता अभिलेख प्राप्त झालेले आहेत. सदर अभिलेखांची खर्च लेखापालांकडून पडताळणीच्या मर्यादेत महाविद्यालयांनी महाडीबीटी पोर्टलवर भरून सादर केलेल्या १९ महाविद्यालयांच्या शुल्कास महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी देण्यात आली. उर्वरित ३२ महाविद्यालयांकडून मागविलेल्या त्रुटी व खुलासे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त होणा-या शुल्कास खर्च लेखापालांच्या पडताळणीच्या मर्यादेत असलेल्या महाडीबीटी पोर्टलवर मंजूरी देण्यात येईल. एकूण १२४ महाविद्यालयांपैकी ९२ महाविद्यालयांनी समितीच्या यापूर्वीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानूसार शुल्क पडताळणीबाबत कार्यवाही केलेली आहे.उर्वरित ३२ महाविद्यालयांकडून शुल्क पडताळणीसाठीचे आवश्यक अभिलेख प्राप्त झाल्याशिवाय त्यांच्या महाडीबीटी पोर्टलवरील शुल्कास मंजूरी देण्यात येवू नये, तसेच अशी महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून किती शुल्क

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI, MUMBAI

Scanned with CamScanner

आकारतात. याबाबत उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या स्तरावरून विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत तपासणी करून माहिती मागविण्यात यावी, असे ठरले.

(परिशिष्ट ड १,ड२,ड३)

उपरोक्त महाविद्यालयांना पोर्टलवर मंजूर करून दिलेले शुल्कच विद्यार्थ्यांकडून आकारणी करण्यात येईल, असे प्रतिज्ञापत्र संस्थेकडून/प्राचार्यांकडून घ्यावे, जी महाविद्यालये असे प्रतिज्ञापत्र लिहून देणार नाहीत अशा महाविद्यालयांची यादी प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांना कळवून सदर महाविद्यालयांचे प्रवेश थांबविणेबाबत विनंती करण्यात यावी, असा निर्णय झाला. सन २०२२-२३ ला ज्या महाविद्यालयांनी खर्चाचे अभिलेख पाठवून शुल्क पडताळणी करून महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करून घेतले आहे अशा महाविद्यालयांना पुढील ३ वर्षापर्यंत सदरचे शुल्क लागू राहील.

**विषय क्र.७ जी महाविद्यालये सन २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट होती तथापि वेळोवेळी मुदतवाढ देवूनसुध्दा सन २०२१-२२ च्या शुल्क निश्चितीकरिता प्रस्ताव सादर केलेले नाहीत, अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ करिता महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती शुल्काबाबत विचारविनिमय करणे.**

-सन २०२१-२२ च्या प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट असणाऱ्या राज्यातील महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्याकरिता वारंवार मुदत देवूनसुध्दा त्यांना सन २०२१-२२ करिता प्रस्ताव सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांचे शुल्क महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करू नये, असा निर्णय समितीच्या दि.२५.११.२०२२ च्या बैठकीत झालेला आहे, तथापि, अनेक महाविद्यालयांकडून सन २०२१-२२ करिता शुल्क निश्चितीचा प्रस्ताव सादर करणेबाबत विनंती करण्यात आली होती. महाविद्यालयांच्या विनंतीवर समितीत चर्चा होवून विचार करण्यात आला आणि ज्या महाविद्यालयांनी सन २०२१-२२ करिता शुल्क निश्चितीचा प्रस्ताव वारंवार संधी देऊनही सादर केलेले नाहीत, अशा महाविद्यालयांना शेवटची संधी म्हणून सन २०२१-२२ करिता विलंब शुल्क स्विकारणीच्या कालावधीपासून आजतागायतपर्यंत प्रतिमाह विलंब शुल्क आकारून प्रस्ताव सादर करण्यास परवानगी देणेबाबत, निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.८ नियमावली व नमुना अर्ज सुधारणा उपसमितीने सादर केलेल्या अहवालानूसार, समितीने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींबाबत कार्यवाही निश्चित करणे, शिक्षण शुल्क समितीस चूकीची माहिती सादर करणाऱ्या महाविद्यालयांवर कार्यवाही करणेबाबत विचार विनियम करणे.**

-शिक्षण शुल्क समितीने ठरवून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारणा-या महाविद्यालयाविरोधात समितीकडे वारंवार तक्रारी प्राप्त होत असतात, अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास समितीकडून तक्रारीबाबत संबंधित संस्थेकडून/ खुलासा मागविणे, त्यानंतर सदरच्या तक्रारीची खातरजमा करून सदर तक्रार व समितीचा अहवाल सदस्य सचिव, शिक्षण

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI, MUMBAI

Scanned with CamScanner

शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र यांच्याकडे सादर करण्यात यावा, अशा प्रकारच्या प्राप्त होणाऱ्या तक्रारीवावत तक्रार निवारण करण्याचे अधिकार सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र यांना प्रदान करणेवावत, निर्णय घेण्यात आला.

**विषय क्र.९ अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या वावतीत शुल्क निश्चिती तसेच नोंदणी व प्रक्रिया शुल्क आकारणेबावत विचारविनिमय.**

एन.सी.टी.ई. च्या ०९-११-२०१६ च्या पत्रान्वये अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या शुल्क निश्चितीबाबत खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

As such, while the Minority Educational Institutions (MEIs) would be free to fix their own fee structure, the committee would have a jurisdiction over them to ensure that fee charged by MEI is not exhorbitant and there is no profiteering involved therein.

अल्पसंख्यांक महाविद्यालयांना त्यांचे शुल्क निश्चिती करण्याचे जरी अधिकार असले तरी एन.सी.टी.ई. च्या दि.०९.११.२०१६ च्या पत्रान्वये सदरचे शुल्क हे अवाजवी व नफेखोरी करणारे नाहीत, याची खात्री करण्याची बाब ही समितीच्या कार्यकक्षेत येते. याअनुषंगाने अल्पसंख्यांक महाविद्यालयांकडून महाडीबीटी पोर्टलवर भरून पाठविलेले शुल्क पडताळणीकरिता सन २०२१-२२ पासून समितीकडे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. अशा अल्पसंख्यांक महाविद्यालयांचे प्रस्ताव खर्च लेखापालांकडून तपासणी करताना खर्च अदा करावा लागत आहे. तरी अल्पसंख्यांक महाविद्यालयांकडून शुल्क पडताळणीकरिता परिपूर्ण माहिती तपासणे गरजेचे आहे त्यामुळे इतर महाविद्यालयांप्रमाणे अल्पसंख्यांक विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून परिपूर्ण प्रस्ताव मागविण्यात यावा आणि सदरचा प्रस्ताव शिक्षणशास्त्र व शारीरिक विषयाचे तज्ज्ञ तसेच खर्च लेखापाल यांच्याकडून तपासून घेण्यात यावा, प्रस्ताव सादर करतेवेळी अल्पसंख्यांक शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांकडून नोंदणी व प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत शासन निर्गमित करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा, असा निर्णय झाला.

**विषय क्र.१०अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

१०.१ जनता शिक्षण प्रसारक समितीचे पंडित राजपती मिश्रा कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, ठाणे या अल्पसंख्यांक महाविद्यालयातील बी.एड व एम.एड अभ्यासक्रमाकरिता एन.सी.टी.ई. ने मान्यता काढून घेतल्यामुळे सदर अभ्यासक्रम कडून अनुक्रमे २०१९ व २०१७ पासून वंद होते तथापि सदर महाविद्यालयास एन.सी.टी.ई. कडून सन २०२२-२३ करिता Restoration order मिळाली असून सन २०२२-२३ मध्ये विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत. अशा महाविद्यालयांना सन २०२२-२३ करिता महाडीबीटी पोर्टलवर शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार शिक्षणशास्त्र(बी.एड) अभ्यासक्रमासाठी रू.१२६०६/- प्रतिवर्ष एवढे शिक्षण

DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI, MUMBAI

Scanned with CamScanner

शुल्क आणि शिक्षणशास्त्र (एम.एड) अभ्यासक्रमासाठी शासकीय महाविद्यालयातील विनाअनुदानित एम.एड अभ्यासक्रमासाठी निश्चित करून दिलेले रू.२०,०००/- प्रतिवर्ष एवढे शिक्षण शुल्क मंजूर करणेबाबत निर्णय घेण्यात आला. सन २०२३-२४ करिता उपरोक्त महाविद्यालयाने शुल्क पडताळणीकरिता प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील.

१०.२ विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम नवीन चालू झाल्यास अशा अभ्यासक्रमासाठी पहिल्या वर्षाकरिता शासकीय महाविद्यालयातील प्रचलित दरानूसार शुल्क लागू राहील. नंतर प्रस्ताव सादर करून शुल्क निश्चिती करणे बंधनकारक राहील.

सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानले व सदर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्र.संचालक, उच्च शिक्षण, पुणे

JT. DIRECTOR, SHIKSHAN SHULKA SAMITI

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती
तथा
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

Scanned with CamScanner